Telegram: **'*MEHERBABA*'** Ahmednagar

Telephone No: 2343666/2324947 Ahmednagar Office
2347093/2341821 Ahmednagar Office
2324249/2325875 Ahmednagar Office
2340666 Ahmednagar Office (Fax Line)
2548777/2548499 Meherabad Office
2548733/2548736 Pilgrim Registration Office
2548211 Meher Pilgrim Retreat

# AVATAR MEHER BABA PERPETUAL PUBLIC CHARITABLE TRUST

Post Bag No. 31, King's Road, Ahmednagar – 414 001, Maharashtra State, INDIA
REGD. NO. E - 150A UNDER THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT, 1950
Registered Under Section 12 - A of Income Tax Act, 1961 No. CH –P – ANGR –1487 – 75 – 76
80 – G Certificate issued by the Commissioner Income Tax, Pune (M. S.)
Regd. No. 083720042 Under Foreign Contribution (Regulation) Act, 1976
PAN **AAATA 3271B**

Shri Shridhar G. Kelkar
CHAIRMAN

Date: १ जुन २०१७

***अवतार मेहेरबाबांचे प्रिय कुटुंबीयजन*,**

जय मेहेरबाबा,

मेहेराझादला आपली तातडीने आता मदत हवी आहे.

मागील दोन वर्षांपासुन पिंपळगांव माळवी भागातील लोकांचा एक छोटासा समुह सातत्याने छळवणुक, विध्वंस आणि मेहेराझाद मालमत्तेवर प्रहार करुन आपले लक्ष साधीत आहेत. हि मंडळी काही स्थानिक आणि शासकिय अधिका–यांना हाताशी घेवुन त्यांच्या योजनेत सहभागी करुन दबाव टाकीत आहेत. या मंडळीनां पुज्य अवतार मेहेरबाबांबदद्ल कुठलाही आदर नसुन त्यांना अवतार काय आहे हे माहित नाही.

या मंडळींना योग्य अशा चर्चेत स्वारस्य नसुन केवळ मेहेराझाद स्थानास त्रास देणे हयाच उदद्शाने पछाडलेले आहेत. अवतार मेहेरबाबा पी. पी. सी. ट्रस्टचे विश्वस्त आणि मेहेराझादचे काळजीवाहु यांनी सतत हया मंडळींनी पुढे ठेवलेल्या मागण्यांसाठी त्यांना भेटून शांततेने चर्चा करण्याचे सर्व अथक प्रयत्न केलेले आहेत. परंतु ही गोष्ट स्पष्ट झालेली आहे की या मंडळींना जोपर्यंत मेहेराझादचे आणि येथील वातावरणास गंभीरपणे हानी होत नाही तोपर्यंत त्यांचे समाधान होणार नाही.

या मंडळींची प्रामुख्याने मागणी आहे की मेहेराझादच्या खाजगी रस्त्यास सार्वजनिक रस्ता बनवुन तेथे ट्रक्स, ट्रॅक्टर्स आणि कारसारखी वाहने आणुन पुढे पिंपळगांव माळवी गांवात नेवुन मेहेराझाद मालमत्तेच्या मधुन किंवा बाजुने रस्ता बनवुन नेता यावीत. कायदेशीररित्या हा खाजगी रस्ता मेहेराझादने सन १९४४ मध्ये पुज्य मेहेरबाबांच्या मार्गदर्शनानुसार मिळविलेला आहे. खरेदीखतात केवळ रस्त्याच्या दोन्ही बाजुस असणा–या शेतक–यांनाच ज्यांच्या शेतजमिनी रस्त्याच्या दोन्ही बाजुस आहेत त्यांनाच खाजगी रस्त्याचा वापर करु दयावा असे स्पष्टपणे लिहीलेले असुन इतर साधारण जनतेस वापर नाही असे नमुद असुनही दुर्दैवाने या नाटकात **कायदा** केवळ औपचारिकता राहिली आहे.

मेहेराझादच्या कायदेशीर हक्कांसह पुढे जागतिक पातळीवरील मेहेराझाद यात्रींचा प्रवास येथील खाजगी रस्तापासुन सुरुवात होते. पुज्य मेहेरबाबा स्वतः हया रस्त्यावरुन चाललेले असुन आणि असंख्य वेळेस प्रवास करीत आलेले आणि गेलेले असुन हा रस्ता अवताराच्या उपस्थितीने पावित्र्यमय झालेला आहे. येथील दुतर्फा बाजुस असणा–या वृक्षांच्या स्वागत कमानीने असणारी वृक्षे ही अवताराच्या विनंतीवरुन त्यांच्या मंडळींकडुन लावलेली आहेत. जर हा रस्ता सार्वजनिक झाला तर लवकरच ही वृक्षे आणि रस्ता जो आध्यात्मिक यात्रेचा आरंभ आहे तो नाहीसा होईल.

संस्थेने कित्येक वेळेस हया खाजगी रस्त्यावरील पुढील थोडा उत्तरेकडील समांतर असणारा पर्यायी रस्ता बांधुन देण्याचा प्रस्ताव ठेवलेला होता. हा पर्यायी रस्ता पिंपळगांव माळवीतील कित्येक शेतकरी बांधवांना एक चांगला सार्वजनिक रस्ता तयार होवुन मेहेराझादचा पावित्र्यमय खाजगी रस्ता जो येथील पवित्र यात्रेचा आरंभ आहे तो अबाधित ठेवुन जसा आज आहे तसा ठेवता येईल.

आम्ही आपणांस एक ई मेल आणि टपाल माध्यमातील निवेदनपत्र भारतातील विविध कार्यालयांकडे लिहिण्यास सांगत आहोत ज्यांचा मेहेराझादच्या भविष्यावर प्रभाव आहे. आपला हयासंदर्भातील सुसंवाद हा एक महत्वाचा घटक असुन मेहेराझाद संवर्धनात त्याचा मोठा भाग राहिल हे आम्हांस माहित आहे. हे अत्यंत आवश्यक आहे की मेहेराझादच्या खाजगी रस्त्याचे महत्व जाणुन शासनाची खात्री पटली पाहिजे की पुज्य मेहेरबाबांचे हजारो भाविक जे येथे त्यांच्या यात्रेसाठी येत असतात. हया शासकीय अधिका-यांची नांवे व पत्ते पत्राच्या शेवटी लिहीलेली आहेत.

प्रत्येक मेहेर भाविकाने स्वतंत्ररित्या लिहीणे जरी आवश्यक असले तरी शेवटी आपल्या भागातील कित्येक मेहेर भाविकांनी समुहाने एक याचिका तयार करुन त्यात खालील मुदद् नमुद करुन त्यावर स्वाक्ष-या किंवा बोटांचे ठसे घेवुन अशी याचिका तयार करावी.

कृपया आपल्या याचिकेत खालील मुदद् आपल्या स्वतःच्या शब्दात लिहुन याचिका तयार करावी जेणेकरुन हि सर्व निवेदने/विनंतीअर्ज एकसारखी दिसणार नाहित आणि एकच मायना होणार नाही याची काळजी घ्यावी.

मेहेराझाद मालमत्ता जेथे पुज्य अवतार मेहेरबाबांनी सन १९४४ पासुन देहत्यागापर्यंत म्हणजे दि. ३१ जानेवारी १९६९ पर्यंत निवास केलेला असुन यामध्ये हा खाजगी रस्ता आणि एकांतवास टेकडी (सिक्लुजन हिल) जिला ‘ धाकटी टेंभी ’ म्हणुन ओळखले जाते अंतर्भूत असुन हि जागतिक स्तरावर यात्रेची ठिकाणे ओळखली जातात.

१. खाजगी रस्ता आणि रस्त्यावरील दुतर्फा बाजुस असणारी वृक्षे ही या यात्रेतील महत्वाची असुन सन १९४४ च्या खरेदीनंतर पुज्य अवतार मेहेरबाबा येथे पायी आणि मोटारकारने कित्येक वेळेस गेलेले असल्याने या रस्त्याचे आत्यंतीक आध्यात्मिक असे विशेष महत्व आहे.
२. खरेदीखतात उल्लेख केल्याप्रमाणे खाजगी रस्त्याच्या दोन्ही बाजुस ज्यांच्या शेतजमिनी आहेत अशाच शेतक-यांनाच केवळ या खाजगी रस्त्यावरुन जाण्याचा हक्क नमुद केलेला असुन हा खाजगी रस्ता आता हळुहळु सार्वजनिक बनु पाहत असुन ज्यांची येथे शेतजमिन नाही किंवा निवास नाही अशी मंडळी मेहेराझादच्या हया खाजगी रस्तातुन पिंपळगांव माळवीत प्रवेश दयावा असे विघ्न टाकत आहेत.
३. खाजगी रस्त्याच्या सुरुवातपासुन मेहेराझादपर्यंत चालत जाणे हे प्रत्येक भाविकास त्यांच्या अंर्तनिहीत यात्रेचा भाग म्हणुन वाटत आलेला आहे.
४. महाराष्ट्र शासनाने **मेहेराझाद** आणि हा खाजगी रस्ता जागतिक यात्रेचे ठिकाण म्हणुन घोषित केलेले आहे.
५. कित्येक वेळेस संस्थेने स्वखर्चाने हया खाजगी रस्त्यावरील उत्तरेकडील समांतर असणा-या रस्त्याचे बांधकाम करुन देण्यास संमती दर्शविलेली आहे. अशा प्रकारे खाजगी रस्त्याच्या दोन्ही बाजुस येथे राहणा-या शेतकरी बांधवांना एक उत्कृष्ट रस्ता मिळुन पिंपळगांव माळवी गांवात जाता येता येईल. हया पर्यायी रस्त्याने जो गांवनकाशात नळपाट म्हणजे पाईपलाईन म्हणुन दाखविलेला आहे आणि जो पिंपळगांव तलावापासुन अहमदनगर शहराकडे जाणारा पिण्याचे

पाणी घेवुन जाणारा मार्ग म्हणुन सुरुवातीस दाखविलेला आहे. ही जमिन नळपाट म्हणुन अहमदनगर म्युनसिपल विभागाने संपादित करुन व पाईपलाईन टाकुन कच्चा रोड बनविला. जेव्हां पिंपळगांव तलावातील पाणी पुरवठा म्युनसिपल विभागाने खंडीत केला तेव्हांपासुन मागील काही दशकात हया रस्त्याचा काहीही वापर नसुन काही भागातील रस्त्यावर संबंधित शेतक-यांनी अतिक्रमण केलेले असुन काही नळपाटीचा भाग मात्र आजही अस्तित्वात आहे.

६. जर हे अतिक्रमण काढुन घेण्यात आले आणि नळपाट रस्ताचा विकास करुन पर्यायी रस्ता बनविला गेला ज्यासाठी जेथे शेतक-यांचे अतिक्रमण असेल तर त्यांना भरपाई म्हणुन दिली जाईल आणि त्यासाठी केंद्र/महाराष्ट्र शासन आणि संबंधित विभागाची संमती आवश्यक आहे. अवतार मेहेरबाबा ट्रस्ट आर्थिकदृष्ट्या हया शेतकरी बांधवांना भरपाई म्हणुन मदत देण्यास तयार असुन त्याचप्रमाणे नळपाटीच्या रस्तावर नवीन रस्ता बांधुन देण्यास तयार आहे.

७. अशा प्रकारे हया प्रस्तावाने खाजगी रस्त्याचे पावित्र्य अबाधित राहुन ज्यावर मेहेर भाविक मेहेराझाद येथे जातात ते राहुन त्याचवेळी एक पर्यायी रस्ता केवळ सभोवतालच्या शेतक-यांना आणि इतर शेतक-यांना मिळुन पिंपळगांवात प्रवेश मिळु शकेल. मागील दोन वर्षांपासुन ही मंडळी मेहेराझादच्या खाजगी रस्त्यातुन किंवा बाजुने पुढे प्रवेश मिळावा म्हणुन आंदोलने करीत आहेत. अशा प्रकारे प्रवेश मिळाल्यास मेहेराझादचे पावित्र्य पुर्णपणे नष्ट होवु शकेल आणि ध्यानकेंद्रातील भाविक जे ध्यान करण्यासाठी येतात ती शांतता नष्ट होवुन ध्यानधारणेत अडथळा निर्माण होईल तसेच प्रदुषण वाढुन, सततची वाहनांची वर्दळ वाढुन कानठळया बसेल असे ध्वनीप्रदुषण वाढेल. येथील स्थानिक गांवक-यांना या पर्यायी नळपाट रस्त्याच्या प्रस्तावाने निश्चितपणे फायदा होवुन त्याचप्रमाणे जगातील पुज्य मेहेरबाबाच्यां सर्व भक्तांना हे मेहेराझाद प्रिय असुन जे त्यांच्या हृदयात वसलेले आहे तेही कायम राहिल.

आम्ही आपले अत्यंत आभारी आहोत की आपण तातडीने या निवेदनास आपले उत्तर देत आहात. ही अत्यंत तातडीची बाब असुन अवतार मेहेरबाबांच्या कुटूंबात तेवढीच महत्वाची आहे. आम्हांस आपले याबाबतीत पुढिल आठवडयात यातील तातडीचे सक्रिय योगदान अपेक्षित असुन आता परिस्थिती ही अत्यंत गंभीर वळणावर आहे. जितकी जास्त याचिका या शासकिय अधिका-यांकडे आपल्याकडुन तिच्या किंवा त्यांच्याकडुन असतील तेवढे जास्त पद्धतीने या बाबतीतील मदतीसाठी याचा जास्त फायदा होईल. प्रियतम अवतार मेहेरबाबांचे निवासस्थान म्हणुन ओळखले जाणारे मेहेराझादचे संवर्धन करुन तिचे संरक्षण करणे हि आपलीदेखील तेवढीच मोठी जबाबदारी आहे.

**अवतार मेहेरबाबा की जय!**

प्रियतम अवतार मेहेरबाबांच्या प्रेमात आणि सेवेत,

श्रीधर केळकर
अध्यक्ष
अवतार मेहेरबाबा पी पी सी ट्रस्ट
अहमदनगर ४१४ ००१ महाराष्ट्र भारत

आपली याचिका खालील पत्त्यांवर आणि ई मेल पत्त्यांवर विविध शासकीय अधिका–यांकडे पाठवावीत.

- **आदरणीय पंतप्रधान श्रीमान नरेन्द्रजी मोदी**
  ७ रेस कोर्स रोड, नवी दिल्ली ११० ००१ भारत
  कार्यालयीन फॅक्स क्रमांक ९१ ११ २३०१९५४५/९१ ११ २३०१६८५७
  ई मेलः narendramodi1234@gmail.com

- **आदरणीय गृहमंत्री श्रीमान राजनाथजी सिंह**
  भारतीय जनता पार्टी
  ११ अशोक रोड, नवी दिल्ली ११० ००१ भारत
  ई मेलः 17akbarroad@gmail.com

- **आदरणीय श्रीमान नितीन गडकरी**
  रस्ते वाहतुक महामार्ग आणि नौकानयन मंत्री
  २ मोतीलाल नेहरु प्लेस, लाल बहादुर शास्त्री स्मारकासमोर
  अकबर रोड, नवी दिल्ली ११० ००१ भारत
  फॅक्स क्रमांक ०११ २३०६०२२
  ई मेलः nitin.gadkari@nic.in

- **आदरणीय मुख्यमंत्री श्रीमान देवेन्द्रजी फडणवीस**
  ६ वा मजला, मुख्य ईमारत
  डॉ. मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ महाराष्ट्र राज्य भारत
  फॅक्स क्रमांक ०२२ २२० २९२१४
  ई मेलः chiefminister@maharashtra.gov.in

- **आदरणीय राज्यपाल श्रीमान सी. विदयासागर राव**
  राज भवन, मलाबार हिल्स, मुंबई ४०० ०३५ महाराष्ट्र राज्य भारत
  फॅक्स क्रमांक ९१ २२ २३६०८७८
  ई मेलः rajbhavan@maharashtra.gov.in

- **आदरणीय जिल्हाधिकारी श्रीमान अभयजी महाजन**
  जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर ४१४ ००१ महाराष्ट्र राज्य भारत
  ई मेलः collector.ahmednagar@maharashtra.gov.in

- **आदरणीय श्रीमान शिवाजी कचरे**
  सहधर्मादाय आयुक्त पुणे विभाग यांचे कार्यालय
  ४५/२ ड, ढोले पाटील रोड, ॲक्सीस बँकेच्या समोर
  पुणे ४११ ००१ महाराष्ट्र राज्य भारत

- **अवतार मेहेरबाबा परपेच्युअल पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट**
  ई मेलः mzadappeal@gmail.com